बिना सहकार नही उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.
नोंदणी क्र.: पी.एन.ए./एच.एस.जी./(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि. २७/१०/१९८९
Email : archananagar.chs @gmail.com

जा. क्र. 2023-24/52 दि. २१/०२/२०२४

## अर्चना नगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सोसायटीच्या पुनर्विकासाबाबत आयोजित विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

संस्थेचे पत्र जा. क्र. २०२३-२४/४७, दिनांक २८ जानेवारी २०२४ अन्वये सदरहू पत्रातील विविध संदर्भीय पत्रे व त्या अनुषंगाने यापूर्वी बहुमताने घेतलेल्या निर्णयांचे पार्श्वभूमीवर दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोजी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा स्व. मुकुंदराव पणशीकर कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र, सेवा भवन, पुणे ४ येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात करण्यात आली होती. सदर सभेस संस्थेतील एकूण १३४ सभासदांपैकी १०२ सभासद उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस संस्थेच्या अध्यक्षांनी सभा आयोजित करण्याचे प्रयोजन व पार्श्वभूमी सविस्तर विषद केली. संस्थेच्या पुनर्विकासासाठी ज्या तीन संस्था (पी.एम.सी.) शॉर्टलिस्ट केल्या होत्या त्यांचे कडून फिजिबिलिटी रिपोर्ट तयार करण्याचा निर्णय यापूर्वीच्या सभेत घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चासाठी प्रति सभासद वर्गणी निश्चित करण्यात आली होती. संस्थेच्या एकूण १३४ सभासदांपैकी १२८ सभासदांनी आपली वर्गणी जमा केल्याने सकारात्मक प्रतिसादाबद्दल अध्यक्षांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

पीएमसी निवडीचे अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याचे दृष्टीने विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यापूर्वी सदरहू संस्थांकडून प्राप्त फिजिबिलिटी रिपोर्टचे संक्षिप्त अहवाल संस्थेच्या दिनांक २८ जानेवारी २०२४ च्या पत्रासोबत सर्व सभासदांना त्यांचे माहितीसाठी व अवलोकनासाठी पाठविण्यात आले होते. तसेच, सदर अहवाल संस्थेच्या कार्यालयात सर्व सभासदांसाठी उपलब्ध करून दिले होते.

**विषय क्रमांक १** : पात्र निविदाधारकानी सादर केलेल्या फिजिबिलिटी रिपोर्टचे संक्षिप्तसादरीकरण सर्व सभासदांसाठीकरणे.

**ठराव क्रमांक १** : तीनही (Taller Redevelopment, Gensys व DD Architect) पीएमसी निविदा धारकांनी त्यांच्या अहवालांचे संक्षिप्त सादरीकरण सर्व सदस्यांसाठी सभागृहात केले.

**सुचक:** रजनीताई भट **अनुमोदक:** धनंजय रानडे

**विषय क्रमांक २** : प्राप्त फिजिबिलिटी रिपोर्ट व संबधित निविदाधारकांनी केलेल्या सादरीकरनाचे अनुषंगाने सर्वकष चर्चा करणे.

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७/१९८९-९० पुणे-४११०३८

**ठराव क्रमांक २** : प्राप्त फिजिबिलिटी रिपोर्ट व संबधित निविदाधारकांनी केलेल्या सादरीकरनाचे अनुषंगाने सर्वांगीण चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत सोसायटीतील ज्येष्ठ अनुभवी व विषयातील तज्ञ या सर्वांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतल्याने चर्चा व्यापक व अर्थपूर्ण होऊ शकली.

**सुचक:** विलास डोंगरे **अनुमोदक:** मोहन देशमुख

**विषय क्रमांक ३** : सर्वंकष चर्चेअंती निवीदा अंतिमत स्वीकृत करण्याबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ३** : तीनही संस्थांच्या सादरीकरणानंतर त्यापैकी कोणत्याही एका सुयोग्य संस्थेची निवड पुढील कामासाठी अंतिम करण्याच्या दृष्टीने मुद्दा अध्यक्ष महोदयांनी चर्चेसाठी मांडला. आवश्यकतेनुरूप मतदान घ्यावयाचे झाल्यास हरकत नाही ही बाब सर्व सदस्यांना स्पष्ट करण्यात आली. बहुतांश सदस्यांनी मतदाना ऐवजी हात वर करून मते आजमावित अशी सूचना केली. त्यानुसार तिन्ही संस्थांबाबत सदस्यांनी दिलेल्या प्रतिसादानुसार डीडी आर्किटेक्ट यांना बहुमताने सदर काम देण्याचा निर्णय घेण्यात आला. बहुमताने पीएमसी ची निवड केल्याबद्दल अध्यक्षांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

**सुचक:** माधव कुलकर्णी **अनुमोदक:** विनायक केळकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक ४** : वरील विषयांचे अनुषंगाने संस्थेच्या अध्यक्षांच्या संमतीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय व त्या बाबत निर्णय घेणे .

**विषय क्रमांक ४ अ** : री-डेव्हलपमेंट समितीची स्थापना करणे

**ठराव क्रमांक ४ अ** : या पुढच्या कामासाठी संस्थेच्या कार्यकारणी व्यतिरिक्त री-डेव्हलपमेंट समिती स्थापन करावी लागेल व त्यासाठी सोसायटीतील या क्षेत्राचे अनुषंगाने अनुभवी व तज्ञ असलेल्या सदस्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्षांनी केले. ज्या सदस्यांना री-डेव्हलपमेंट समितीत स्वईच्छेने यायचे आहे त्यांनी व्यवस्थापन समितीस ४ मार्च २०२४ पर्यत अर्ज द्यावेत. सदर री-डेव्हलपमेंट समितीत, सोसायटीतील स्वइच्छेने सहभागी होणारे १० सदस्य तांत्रिक तज्ञ या व्यतिरिक्त व्यवस्थापन समितीतील तीन सदस्य सदर रीडेव्हलपमेंट समितीत राहतील. त्यानंतर कार्यकारिणीच्या सभेमध्ये कार्यकारणी मध्ये री-डेव्हलपमेंट कमिटी निवडण्यात येईल व नंतर घोषित केली जाईल..

**सुचक:** आशिष कुलकर्णी **अनुमोदक:** साधना लोकरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सोसायटी पुनर्विकासाचे अनुषंगाने आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या अध्यक्षांनी आभार मानले व सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**Archananagar Sahakari Gruharachana Sanstha Maryadit**

Chairman Secretary Treasurer